ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक १९८ • मंगळवार दि.५ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# खडकपुरा-वाघी रोडवर अतिक्रमण हटविण्यास जमावाचा विरोध

## कारवाई दरम्यान पोलीसांचा सौम्य लाठीमार

**नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील खडकपुरा ते वाघी रोड परिसरात आज (५ मे) महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी मोहिमे दरम्यान मोठा गोंधळ उडाला. अतिक्रमण काढत असतांना जमावाने विरोध केला. पोलीसांनी जमावावर सौम्य लाठीमार करुन जमाव पांगविला. रस्त्यावरील अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले.**

सोमवारी वाघी रोडवर अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेल्या महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाला जमावाने विरोध करुन जेसीबी चालकास बेद्दम मारहाण केली होती. पोलीस बंदोबस्त कमी असल्याने हा प्रकार घडला होता. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून काही जणांना अटक करण्यात आली. आज (मंगळवार) सकाळी प्रचंड पोलीस फौजफाट्यासह महापालिकेचे उपायुक्त अजितपालसिंघ संधू, उपायुक्त गुलाम सादीक, सहाय्यक आयुक्त रमेश चौरे, गौतम कवडे, रावण सोनसळे, राजेश जाधव, डॉ.बेग, अग्नीशामन दलाचे प्रमुख के.जी.दासरे यांच्यासह महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथकाचे कर्मचारी दाखल झाले. खडकपूरा येथील पाण्याच्या टाकी ते वाघी रोड या रस्त्यावरील दोन्ही बाजुने करण्यात आलेले अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटविण्यास सुरुवात केली असतांना पुन्हा जमाव जमा झाला. या जमावाने महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत वाद घालत अतिक्रमण हटविण्यास विरोध केला. अतिक्रमण हटविण्यास अडथळा निर्माण करीत असतांना पोलीसांनी जमावावर सौम्य लाठीचार्ज करुन जमावाला पांगविले. महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने रस्त्यावरील २० ते २५ अतिक्रमण जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त केले. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेतले. या भागात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



(छाया : करणसिंह बैस)



# पालकमंत्री अतुल सावेंच्या ओएसडीवर गुन्हा दाखल

## मोबाईल पासवर्डवरुन पत्नीच्या खुनाचा प्रयत्न

पुणे: नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा भाजप नेते ना.अतुल सावे यांचे विशेष कार्यसान अधिकारी (ओएसडी) विजय धुलचंद कारंडे यांच्याविरोधात पत्नीच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३० एप्रिल रोजी सायंकाळी पुणे येथील कोरेगाव पार्क परिसरात घडली.

राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी घटना पुण्यात उघडकीस आली असून पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोबाईलमधील चॅटवरून निर्माण झालेल्या वादातून हा गंभीर प्रकार घडला. कारंडे यांच्या पत्नीने त्यांच्या मोबाईलचा पासवर्ड मागितल्याने ते संतापले. यानंतर वाद विकोपाला जाऊन त्यांनी पत्नीला क्रिकेटच्या बॅटने बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे.इतक्यावर न थांबता, त्यांनी पत्नीचा गळा दाबून तिचा खून करण्याचा प्रयत्न केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आईला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या त्यांच्या अल्पवयीन मुलालाही आरोपीने बॅटने मारहाण केल्याचा धक्कादायक आरोप आहे.या हल्ल्यानंतर जखमी पत्नी आणि मुलगा कसाबसा स्वतःचा जीव वाचवत घराबाहेर पडले आणि थेट कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी कारंडे यांच्या विरोधात खुनाचा प्रयत्न, जाणीवपूर्वक दुखापत करणे आणि धमकी देणे अशा गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.दरम्यान, कारंडे हे मूळचे नांदेड येथील समाजकल्याण विभागात कार्यरत असून सध्या मंत्रालयात ओबीसी कल्याण व ऊर्जा विभागाशी संबंधित मंत्र्यांचे ओएसडी म्हणून प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. या घटनेमुळे घरगुती हिंसाचाराचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## सरकारला आपटावेच लागेल- जरांगे पाटील

सोलापूर : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनीही भाजपच्या विजयावर शंका उपस्थित केली आहे. तसेच, राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरूनही संताप व्यक्त करत, फडणवीसांचे सरकार आपटावेच लागेल, असेही म्हटले. अकलूज येथील सकल मराठा मोर्चाचे समन्वयक धनाजी साखळकर यांच्या आईच्या मृत्यूनंतर जरांगे पाटील यांनी रात्री त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. त्यानंतर कार्यकर्त्यांशी बोलताना फडणवीस सरकारवर जोरदार निशाणा साधला.

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन महत्वपूर्ण निर्णयाला मंजुरी

मुंबई/प्रतिनिधी-दुर्गम व डोंगराळ भागातील खाजगी संस्थानच्या २४ आश्रम शाळांना श्रेणीवाढ देण्यासोबतच धाराशिव जिल्ह्यातील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेस राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली.



राज्य मंत्रिमंडळाची साप्ताहिक बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत शिक्षण क्षेत्राला चालना देणारे तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आश्रमशाळांची श्रेणीवाढ, सोलापूर येथे नवीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करणे आणि धाराशिवमधील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून दुर्गम व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. स्वयंसेवी संस्थांच्या पाच प्राथमिक व १९ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. यामध्ये प्राथमिक शाळांचे माध्यमिकमध्ये आणि माध्यमिक शाळांचे कनिष्ठ महाविद्यालयात रूपांतर होणार असून त्यासाठी आवश्यक पदनिर्मिती आणि खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावरच उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत सोलापूर येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पदवी स्तरावरील तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या शाखांमध्ये प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेसह अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. यामुळे सोलापूर व परिसरातील विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर दर्जेदार तांत्रिक शिक्षणाची संधी मिळणार आहे. त्याचसोबत धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला.

### लैंगिक गुन्हेगारांना पॅरोल नाही-मुख्यमंत्री

लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपींना कोणत्याही परिस्थितीत पॅरोल देऊ नये, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.मंत्रालयात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वाचा पान ४ वर

# पिंपळगाव नदी घाटावर रेती उपसा करणाऱ्या तीन जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील पिंपळगाव निमजी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या तीन जणांना नांदेड ग्रामीण पोलीसांनी अटक करुन ४७ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

पिंपळगाव निमजी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.ओमकांत चिंचोलकर, फौजदार बाबुराव चव्हाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी सायंकाळी नदी घाटावर धाड टाकली. नदीपात्रातून रेती उपसा करीत असतांना शंकर व्यंकटराव डक, चांदु व्यंकटराव डक व पांडूरंग सदाशिव डक सर्व रा.पिंपळगाव निमजी यांना अटक केली. घटनास्थळावरुन पोलीसांनी ४० तराफे, ९ इंजीन, रेती पात्रातून उपसा केलेली पाच ब्रास रेती असा ४७ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# कायद्याची अंमलबजावणी नसल्याने भोंदू बाबांचे पेव-प्रा.श्याम मानव

नांदेड/प्रतिनिधी-अंधश्रद्धा विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी होत नसल्याने महाराष्ट्रात भोंदू बाबांचे प्रमाण वाढत असल्याचा दावा अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रमुख प्रा.श्याम मानव यांनी केला.

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) व समविचारी संघटनांच्या वतीने ४ मे रोजी सायंकाळी कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात ''बुवा तेथे बाया'' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. या व्याख्यानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून सभागृह तुडुंब भरले होते. अनेकांना खाली बसून तसेच दरवाज्याजवळ उभे राहून व्याख्यान ऐकावे लागले.

प्रा.श्याम मानव म्हणाले की, राज्य शासनाने अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा केला असला तरी त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलिसांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. अनेक वेळा कायद्याची अंमलबजावणी करताना पोलिसांवर राजकीय दबाव येतो. परिणामी अशोक खरात, धीरेंद्र शास्त्री यांसारख्या भोंदू बाबांचे प्रस्थ वाढत आहे. आपल्या व्याख्यानात त्यांनी देशभरातील भोंदू बाबांच्या फसवणुकीच्या आणि महिलांवरील शोषणाच्या अनेक सत्यकथा पुराव्यासह मांडल्या. महिला बाबांच्या नादी का लागतात, त्यांना कोणती प्रलोभने दिली जातात, आर्थिक व शारीरिक शोषण कसे केले जाते, तसेच अशा ढोंगी बाबांना ओळखण्याचे मार्ग कोणते, याचा सविस्तर उहापोह त्यांनी केला. जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत अशा प्रकरणांवर कारवाई कशी होऊ शकते, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

कौटुंबिक अडचणी, आजारपण किंवा मानसिक तणावातून मार्ग काढण्यासाठी अनेक महिला भोंदू बाबांच्या जाळ्यात अडकतात, असे सांगत त्यांनी यासंबंधीची अनेक उदाहरणे नावासहित मांडली. राज्य शासनाला खरोखरच अंधश्रद्धा निर्मूलन करायचे असेल, तर संबंधित कायद्याची कठोर अंमलबजावणी करत पोलिस व प्रशासनाला योग्य प्रशिक्षण देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे उद्घाटन अंनिसच्या कार्यकर्त्या सुलोचनाताई मुखेडकर यांच्या हस्ते झाले. कॉ. विजय गाभने यांनीही सभेला संबोधित केले. सूत्रसंचालन कॉ. उज्वला पडलवार यांनी केले. यावेळी मंचावर एकनाथ मोरे, आनंद चव्हाण, डॉ. सचिन सरोदे, डॉ. विठ्ठल भंडारे, अॅड.कॉ. प्रदीप नागापूरकर, प्रा. अनंत राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. प्रा.श्याम मानव यांच्या तर्कशुद्ध व पुराव्यांवर आधारित मांडणीमुळे उपस्थितांमध्ये अंधश्रद्धेविरोधी जागरूकतेची ठोस भावना निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. यावेळी अंनिसचे जिल्हा संघटक प्रा.इरवंत सूर्यकार, सुरेश



झुरमुरे, प्रा.देविदास इंगळे, दत्ता तुमवाड, प्रा.ब. ना.गोइनवाड, प्रज्ञाधर कांबळे, कॉ.लता गायकवाड, सपना टोमके, डी.एन.मोरे खैरकेकर, बालाजी पाटोळे, कॉ. शिवाजी फुलवळे, कॉ. भगवान नाईक, कॉ. गंगाधर गायकवाड, प्रा.नरेश भिसे, मचिंद्र गवाले, अॅड. सतिशकुमार जाधव, शिवश्री संकेत पाटील, कॉ.अंबादास भंडारे, कॉ. जयराज गायकवाड, कॉ. प्रफुल कौडकर, योगेश टोमके आदींनी परिश्रम घेतले.

# "जनादेशाचे बदलते रंग"

**पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल भारतीय राजकारणातील बदलत्या प्रवृत्तींचे ठळक चित्र उभे करतात. या निकालांनी केवळ सत्तांतरच घडवले नाही, तर मतदारांच्या अपेक्षा, राजकीय रणनीती आणि लोकशाही प्रक्रियेतील विश्वास-अविश्वास यांनाही केंद्रस्थानी आणले आहे. विशेषतः भारतीय जनता पक्षाने तीन राज्यांत मिळवलेले यश राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे ठरले आहे.पश्चिम बंगालमधील निकाल सर्वाधिक लक्षवेधी ठरले. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जन्मभूमीत भाजपने अखेर सत्तेवर झेंडा रोवला, ही ऐतिहासिक बाब मानावी लागेल. दीर्घकाळ डाव्या पक्षांचे वर्चस्व आणि त्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसची सत्ता या पार्श्वभूमीवर हा बदल लक्षणीय आहे. मात्र, या निवडणुकीत केवळ राजकीय लढतच नव्हती, तर निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासाचाही प्रश्न चर्चेत होता. प्रचारादरम्यान पश्चिम बंगालमध्ये मत चोरी, मतदार यादीतून नावे वगळली जाणे आणि पुनर्परीक्षण प्रक्रियेतील त्रुटी हे गंभीर आरोप सातत्याने पुढे येत होते. विरोधी पक्षांनी या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेतली, तर सत्ताधाऱ्यांनी ते फेटाळले. या पार्श्वभूमीवर मिळालेला निकाल केवळ विजय-पराजयाचा नसून लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची गरज अधोरेखित करणारा आहे. मतदारांचा कौल स्पष्ट असला, तरी निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता टिकवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. तामिळनाडूमध्ये वेगळाच राजकीय प्रयोग पाहायला मिळाला. चित्रपटसृष्टीतील लोकप्रियतेच्या जोरावर अभिनेता विजय थलपती यांनी नव्या पक्षाच्या माध्यमातून प्रभावी कामगिरी करत पारंपरिक सत्ताकेंद्रांना आव्हान दिले. तामिळनाडूच्या राजकारणात व्यक्तिमत्त्वाधारित नेतृत्वाचा प्रभाव कायम असल्याचे या निकालातून पुन्हा स्पष्ट झाले. मतदारांनी नव्या पर्यायाला दिलेला प्रतिसाद हा बदलाच्या इच्छेचा संकेत मानला जातो. केरळमध्ये पारंपरिक सत्तांतराची पद्धत पुन्हा एकदा अधोरेखित झाली. मागील निवडणुकीत डाव्या आघाडीला सलग दुसऱ्यांदा संधी दिल्यानंतर यावेळी मतदारांनी काँग्रेसप्रणीत आघाडीवर विश्वास दाखवला. यावरून केरळमधील मतदार सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून निर्णय घेतात, हे पुन्हा स्पष्ट झाले. सत्तेतील बदल ही केवळ राजकीय घटना नसून लोकशाहीतील संतुलन राखण्याची प्रक्रिया आहे. आसाममध्ये मात्र सातत्य दिसून आले. भाजपने पुन्हा सत्ता राखत ईशान्य भारतातील आपले बळ सिद्ध केले आहे. स्थानिक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणे, संघटनात्मक विस्तार आणि नेतृत्वाची सातत्यपूर्ण उपस्थिती या घटकांमुळे भाजपला येथे यश मिळाले आहे. हा विजय त्या प्रदेशातील राजकीय स्थैर्याचे द्योतक मानला जातो. या सर्व निकालांचा व्यापक विचार केला असता, भारतीय मतदार अधिक सजग आणि अपेक्षाभिमुख होत असल्याचे दिसते. ते केवळ परंपरेला अनुसरून मतदान करत नाहीत, तर कामगिरी, पर्याय आणि विश्वासार्हता या निकषांवर निर्णय घेतात. पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित झालेले प्रश्न असोत किंवा तामिळनाडूमधील नव्या नेतृत्वाचा उदय, हे सर्व घटक भारतीय लोकशाही अधिक गतिमान होत असल्याचे दर्शवतात.एकूणच, या निवडणुकांनी स्पष्ट केले आहे की; सत्तेचा मार्ग हा केवळ प्रचारातून नव्हे, तर विश्वास, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेतून जातो. मतदारांचा कौल हा अंतिम असतो, परंतु त्या कौलामागील प्रक्रिया तितकीच स्वच्छ आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. भविष्यातील राजकारणासाठी हेच या निकालांचे सर्वात महत्त्वाचे धडे ठरतील.**

# वेळीच सावध व्हा! यंदा बदलत्या हवामानामुळे उन्हाचे चटके; दुष्काळाचे सावट व मान्सूनवर "एल निनो" चे संकट

**रमेश लांजेवार**
नागपूर.

दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे वातावरणात आमुलाग्र बदल होतांना दिसतो. यामुळे अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून पाण्याचा दुष्काळ पडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सध्याच्या परिस्थितीत राज्यासह देशातील अनेक भागात ४० ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पोहोचले आहे, म्हणजे सर्वत्र तापमानाने ४० अंश सेल्सिअस तापमान पार केल्याचे स्पष्ट दिसून येते. काही भागात वादळी वाऱ्यासह बेमोसमी पाऊस पडत आहे. यामुळे संपूर्ण वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. राज्यासह देशातील ज्या शहराचे तापमान जास्तीत जास्त फक्त ४० अंश सेल्सिअस पर्यंत रहात होते त्या संपूर्ण शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पार केल्याचे दिसून येते.हा तापमान वाढीचा प्रकार अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस वाढत्या तापमानामुळे मोठी बिकट आणि गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे.

आज देशातील औद्योगिक, शहरीकरण, सिमेंट रोड, गाड्यांचा धुर, एसी, लोकांच्या वाढत्या सुखसुविधा यामुळे तापमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असून याचा परिणाम आपणा सर्वांना भोगावा लागत आहे. अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून याचा परिणाम शेतीवर मोठ्या प्रमाणात पडत असुन यंदा दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांच्या डोक्यावर मंडरावतांना दिसत आहे. सोबतच राज्यात एल निनोमुळे भीषण पाणी टंचाईचे संकट ओढवण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. कारण प्रशांत महासागरामध्ये एल निनोची स्थिती सक्रिय होत असल्याने मान्सूनच्या पावसावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची भीती वर्तवली जात आहे. यामुळे मान्सूनच्या उत्तरार्धात म्हणजे जुलै ते सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण अधिक कमी राहू शकते. एल निनोमुळे महाराष्ट्रातील बहुतांश भागात विशेषत: मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात, नेहमीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. किनारी कोकण विभाग तसेच विदर्भातील काही भागात तुलनेने पावसाचे वितरण चांगले राहू शकते. परंतु सरासरीपेक्षा कमी पावसाचा धोका असल्याने खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. यंदाची भीषण उष्णता ही वाढते औद्योगिकीकरण, कार्बन उत्सर्जन आणि बेसुमार जंगलतोडीचा परिणाम आहे. ही समस्या तात्पुरती नसून भविष्यात महाभयानक संकटाची नांदी आहे यावर वेळीच लगाम कसली नाही तर भयावह संकट निर्माण होऊ शकते. कारण सध्याच्या परिस्थितीत विदर्भातील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -४५, वर्धा -४५, नागपूर -४४.४, अमरावती -४४.२, गोंदिया -४४.५, यवतमाळ -४३.२, ब्रम्हपुरी -४३.२, गडचिरोली-४३.२ अंश




सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत. यामुळे विदर्भ जनूकाय आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे.कारण आजच्या परिस्थितीत विदर्भ हे जगातील हॉट शहरांमध्ये गणल्या गेले आहे ही चिंताजनक बाब आहे. देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे, तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे हा सर्व प्रकार आणि येणारे एल निनोसंकट मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली गंभीर आणि धोकादायक परिस्थिती आहे. असे सांगितले जाते की १४० वर्षांनंतर हा एल निनो येत आहे ही महाभयंकर संकटांची नांदी आहे. पॅसिफीक महासागरात जेव्हा तापमान वाढते तेव्हा जगाचे हवामान चक्र बिघडते असे सांगितले जाते यालाच एल निनो म्हणतात. परंतु ही अत्यंत धोक्याची घंटा आहे. कारण एल निनोमुळे महासागराचे तापमान २ अंश सेल्सिअसने वाढल्याचे सांगितले जाते. महासागराचे तापमान वाढणे म्हणजे संपूर्ण सृष्टीला धोक्याचे संकेत आहे. कारण बदलत्या हवामानामुळे देशासह संपूर्ण जगात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून दिवसेंदिवस समुद्राचे पाणी वाढत आहे व जमीनीच्या पोटातील पाणी कमी-कमी होत आहे. हा सर्वप्रकार जंगलतोडीमुळे निर्माण झाला आहे. कारण शहरीकरण व आधुनिकीकरणामुळे जेवढेही पावसाचे पाणी पडते त्याच्या ८० टक्के पाणी समुद्राला जाऊन मिळते. कारण वाढत्या औद्योगिकरण व शहरीकरणामुळे जमीनीत पाणी जाण्याचे मार्ग ८० टक्के मार्ग बंद झाले आहे. त्यामुळे पाणी जमिनीच्या मुळाशी जातच नाही. याचा परिणाम म्हणजे तापमानात वाढ व भीषण पाणी टंचाई दिसून येते. राज्यांच्या विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे सांगितले जाते आणि आता एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी होण्याची चिन्हे आहेत. यावर सरकारने उपाययोजना करण्याची सुरुवात केली आहे.परंतु या संपूर्ण परिस्थितीला सर्वात जास्त औद्योगिकरण, शहरीकरण व जंगलतोड जबाबदार आहे. जोपर्यंत राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली होणारी जंगलतोड थांबणार नाही आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणार नाही तोपर्यंत आपण या भयावह घटनांवर मात करू शकणार नाही. त्यामुळे राज्यासह देशातील वाढते तापमान पहाता व वेळोवेळी बदलते हवामान पहाता वृक्षलागवड युद्धपातळीवर होणे आवश्यक आहे. मुख्यत्वेकरून राज्य सरकार, सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यारये यांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण केले पाहिजे.आजही राज्यासह देशातील अति दुर्गम भागात पिण्याच्या पाण्यासह अनेक गंभीर समस्या आहेत. यामुळे या भागात आपल्याला कुपोषण, भुकमरी असे भयावह चित्र दिसून येते. त्यामुळे पावसाचे पाणी रोखायचे असेल वृक्षलागवड करणे गरजेचे आहे अन्यथा शेतकऱ्यांचे हाल बेहाल होतील व याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागेल. जय हिंद.

# 'द महाराष्ट्र अर्थ सायन्स पीवायक्यूएस कॉम्पेंडिअम' पुस्तकाचे प्रकाशन

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून स्थानिक नांदेड एज्युकेशन सोसायटी संचालित सायन्स कॉलेज, नांदेड येथे महाविद्यालयातील अधिव्याख्याते आणि संशोधक प्रा.आकाश करंडे लिखित भूशास्त्र विषयातील अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या 'द महाराष्ट्र अर्थ सायन्स पीवायक्यूएस कॉम्पेंडिअम' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजवंदनानंतर हा सोहळा संपन्न झाला. यावेळी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल अग्रवाल, सचिव प्रा. श्यामलताई पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, उपप्राचार्य प्रा. एम. खिल्लारे, उपप्राचार्या डॉ. अरुणा शुक्ला यांची प्रमुख उपस्थिती होती. हे पुस्तक प्रामुख्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या भूशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आले असून, यात विविध परीक्षांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांचा सखोल संग्रह करण्यात आला आहे. भूगर्भशास्त्र, खनिजशास्त्र आणि महाराष्ट्राची भौगोलिक रचना या विषयांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत दिशादर्शक ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकाशन सोहळ्याला महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. बैनवाड, प्रबंधक गौतम वाघमारे, डॉ. के. आर. गायकवाड यांच्यासह प्रा. पवार, प्रा. राजेश आचेगावे, प्रा.डॉ. विनोद चव्हाण, प्रा. जोशी, प्रा. अंकिता वडजे,



प्रा. प्रतीक्षा सुर्वे, प्रा. खुरांगे, प्रा. निलवर्ण आणि प्रा. पाटील यांची उपस्थिती होती. आपल्या पहिल्या पुस्तकाबद्दल बोलताना प्रा. आकाश कारंडे यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील भूशास्त्राच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये एकाच ठिकाणी सर्व प्रश्न उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

# वाणिज्य शाखेत वैष्णवी दिलीप बिचेवार महाविद्यालयात प्रथम

उमरखेड/प्रतिनिधी-वाणिज्य शाखेतून विडुळ येथील वैष्णवी दिलीप बिचेवार हिने ९१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे.उमरखेड येथील मॉडर्न पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्याल-यातील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेच्या यशाची परंपरा यदाही कायम राखाली आहे. विद्यालयाचा वाणिज्य व विज्ञान विभागाचा निकाल १०० टक्के आहे.

तनिष्क जयस्वाल ९०.८३ टक्के गुणांसह द्वितीय तर सायली मुन्नरवार आणि ओमकार गावंडे यांनी प्रत्येकी ८८.१७ टक्के गुण मिळवून संयुक्तपणे तृतीय क्रमांक पटकावला. इंग्रजी माध्यमाच्या वाणिज्य विभागातील एकूण ५६ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, तर १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून रूपेश रामेश्वर कदम प्रथम, साक्षी विठ्ठल अनखुळे हिने द्वितीय, तर निकिता सुनीता चव्हाण व अस्मिता रामेश्वर सुरोशे यांनी तृतीय क्रमांक पटकावून यश संपादन केले.विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विडुळ येथील वाणिज्य शाखेतून वैष्णवी दिलीप बिचेवार हिने ९१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला या यशाबद्दल तिचे विडुळ मध्ये विशेष कौतुक करण्यात येत असून तिचे आई, वडील सामान्य परिस्थितीतील असून, वैष्णवीच्या शिक्षणासाठी ते नेहमी धडपडत असतात तिच्या या यशाबद्दल तिने आई-वडील आणि मार्गदर्शक शिक्षिका व्यास मॅडम यांना विशेष श्रेय दिले आहे.व्द्यिाध्यर्थ्यांच्या यशाब्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य आणि सर्व शिक्षक वृंदांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




# देगलूर महाविद्यालयाने यशाची परंपरा राखली ;यंदाही मुलींनीच मारली बाजी

देगलूर/प्रतिनिधी-येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाने शैक्षणीक सत्र २०२५-२६ मधे झालेल्या बारावी परीक्षेचा महाविद्यालयाचा निकाल जाहीर झाला असून यंदा ही देगलूर महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाचा निकाल उल्लेखनीय लागला आहे.

म.रा.मा.उ.मा.शिक्षण मंडळ लातूर च्या वतिने फेब्रु.-मार्च वर्ष २०२५-२६ मधे बारावीची परिक्षा घेण्यात आली होती. यामधे येथील देगलूर महाविद्यालयातील कला,वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम शाखेचे विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली. यशस्वी विद्यार्थ्यांमधे वाणिज्य शाखेतील कु.आम्रपाली माधव कांबळे प्रथम क्रमांक ९३.६७% तर द्वितीय क्रमांक कु.मेघा रामराव तडखेले हिने ८९% गुण प्राप्त केले तर तिसरा क्रमांक पटकावून कु प्रियंका विजय बामणे हिने ८८.६७%गुण मिळवीले आहे तर विज्ञान शाखेतील .विद्यार्थी पार्थ दत्तपसन्न साखरे यास ८५.५० तर द्वितीय क्रमांक कु.श्रेया चंद्रशेखर कौरवार हिला ८२% तर तृतीय क्रमांक असित गिरीश जिल्हेवार यास.८१.८३% गुण मिळाले आहेत.तर कला शाखेतून प्रथम कु.भाग्यश्री नागनाथ पांचाळ हिला ७९.१७%,प्रथम, द्वितीय क्रमांक पोर्णीमा हिरामन कांबळे हिला ७४.३३% गुण मिळाले तर कु.माया रामदास नुकूलवार हिने ७१.३३% घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे.एकूण विद्यार्थ्या मधे विज्ञान शाखेतील ४५४ विद्यार्थी परीक्षा दिली होती यात ७ विद्यार्थी विशेष श्रेणी प्राप्त केले आहेत. वाणिज्य शाखेत एकूण १८ जण विशेष श्रेणीत कला शाखेतील १ विद्यार्थी विशेष श्रेणीत उतीर्ण झाला आहे. तर्कशास्त्राचा १००% निकाल लागला आहे यात कु. माया नुकुलवाड हिला ९७, कु.माहेश्वरी कडलवार ९६ आणि कु.प्रतिक्षा भोईवारला ९४ गुण मिळाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे यावेळी महाविद्यालय आणि अडत व्यापारी संस्थेच्या वतिने सत्कार करण्यात आला.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# नांदेड जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी ५१.५८ कोटींचा कृती आराखडा

## पाणी टंचाई निवारणासाठी प्रशासन सज्ज

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन सन २०२५-२६ या कालावधीसाठी व्यापक कृती आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला असून, जानेवारी ते मार्च २०२६ आणि एप्रिल ते जून २०२६ या कालावधीसाठी एकूण सुमारे ५१.५८ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.जिल्ह्यात पाणी टंचाई उद्भवू नये यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

जिल्हास्तरावर पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ग्रामीण व शहरी भागासाठी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रामीण भागासाठी २४.१७ दलघमी, नांदेड महानगरपालिका क्षेत्रासाठी ४९.०४ दलघमी, तर नगर परिषद क्षेत्रासाठी २६.७६१ दलघमी असे एकूण ९९.९७१ दलघमी पाणी विविध धरणे व जलाशयांमध्ये आरक्षित करण्यात आले आहे.पाणी टंचाई निवारणासाठी विविध उपाययोजनांनाही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये २७१ नळयोजना विशेष दुरुस्ती, १०४ तात्पुरत्या पूरक नळयोजना, ५३४ नवीन विंधण विहिरी, तसेच १३ विहिरींचे खोलकरण व गाळ काढण्याच्या कामांचा समावेश आहे. अशा एकूण ९२२ उपाययोजना मंजूर करण्यात आल्या आहेत. दरम्यान, ४ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यातील गावे, वाड्या व तांड्यांना ५८ विहीर/बोअरवेल अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा सुरू असून सध्या एकही टँकर सुरू करण्यात आलेला नाही.प्रशासनाकडून पाणी टंचाई टाळण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबवण्यात येत असून, नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यावर भर दिला जात आहे.

# मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करा;आपत्ती टाळण्यासाठी सज्ज राहा-जिल्हाधिकारी



नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात संभाव्य पावसाळी आपत्ती टाळण्यासाठी सर्व विभागांनी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावीत आणि आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलिस अधिक्षक सूरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुन्हे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, यावर्षी पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी उष्णतेमुळे अचानक मुसळधार पावसाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी प्रशासनाने सज्ज राहणे गरजेचे आहे. विष्णुपूरी धरणात सध्या पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा असून त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच धरणाचे गेट, नवीन पाईपलाईन कामे यांची स्थिती तपासण्याचे निर्देश देण्यात आले. मागील वर्षी मुखेड, नायगाव, बिलोली, कंधार यासह विविध तालुक्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला होता. यंदा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.शहरातील नाल्यांची स्वच्छता करून सखल भागात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच पूल आणि रस्त्यांवरून पाणी वाहून जाऊन नागरिक अडकणार नाहीत यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.आरोग्य विभागाला ग्रामीण भागात औषधसाठा मुबलक ठेवण्याचे, तसेच सर्पदंशावरील औषधे सर्व आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने नदीपात्रात पशुधन बांधू नये यासाठी जनजागृती करावी, असेही सांगण्यात आले. बैठकीच्या शेवटी, सर्व विभागांनी तालुका पातळीवरील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तात्काळ जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी यांनी सर्व उपविभागीय अधिकारी यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या.यावर उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शन केले व सर्व विभागांनी समन्वय ठेवून कामे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.


# माहूरमध्ये गुणवंतांना न्याय;शिक्षकांना आत्मपरीक्षणाची गरज

माहूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यंदाचा निकाल अनेक बाबतीत लक्षवेधी ठरला आहे. आकडेवारीचा सखोल अभ्यास केला असता माहूर तालुक्यात खऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना न्याय मिळाल्याचे स्पष्ट होत आहे, तर काही शाळांसाठी आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित झाली आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ दरम्यान पार पडलेल्या परीक्षेसाठी शासन व मंडळ स्तरावर व्यापक नियोजन करण्यात आले होते. कॉपी रोखण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा, भरारी पथके, कडक कारवाईची तरतूद, तसेच परीक्षा केंद्रांभोवती प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. जिल्हाधिकारी कर्डीले यांनी स्वतः परीक्षा केंद्रांना भेटी देत पाहणी केली, तर तालुका स्तरावर तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके कार्यान्वित करण्यात आली होती. परीक्षा काळात केंद्रांच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर बंद ठेवणे, गैरप्रकार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, तसेच राज्य व जिल्हास्तरीय दक्षता समित्यांमार्फत देखरेख वाढविणे अशा उपाययोजनांमुळे परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि शिस्तबद्ध झाली.या कडक अंमलबजावणीमुळे कॉपीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला न्याय मिळाला. परिणामी कॉपी बहाद्दरांना आळा बसल्याने काही ठिकाणी निकालात घसरण झाल्याचे दिसून आले. दरम्यान, तालुक्यातील शैक्षणिक निकालात मोठी तफावत दिसून आली. शंकरराव चव्हाण कला विद्यालयाचा निकाल केवळ १९.६७ टक्के लागून तो सर्वात कमी ठरला. याउलट, सावित्रीबाई फुले विद्यालय, आष्टा (विज्ञान शाखा) ने ९६.०४ टक्के निकालासह अव्वल स्थान पटकावले. तालुक्यातील इतर शाळांचे निकाल पुढीलप्रमाणे वसंतराव नाईक विद्यालय, सिंदखेड ५५.८८, शंकरराव चव्हाण विद्यालय, आष्टा विज्ञान ८६.७१% कला १९.६७%, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, माहूर ६२.५०% श्री रेणुका देवी कनिष्ठ महाविद्यालय, माहूर विज्ञान ८८.२८% कला ७८.२६%, सावित्रीबाई फुले विद्यालय, अंजनखेड विज्ञान ९४.०६% कला ६६.२३%, कै. गोविंदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वझरा विज्ञान ८७.२७% कला ६८% कै. देवराव पाटील विद्यालय ५८.०६% वसंतराव नाईक विद्यालय, वानोळा ७५.८६% पार्वतीबाई उच्च माध्यमिक विद्यालय, वाई बाजार ८०.५५% जीनियस इंग्लिश स्कूल, माहूर विज्ञान शाखा ९४% एकूणच, कॉपीमुक्त अभियानामुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढली असून विद्यार्थ्यांच्या वास्तविक गुणवत्तेचे प्रतिबिंब निकालात दिसून आले आहे.

# पश्चिम बंगाल व आसामचा विजय जनतेच्या विश्वासाचा-चैतन्यबापू देशमुख

नांदेड/प्रतिनिधी-पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेला विजय हा केवळ निवडणुकीचा निकाल नाही, तर तो जनतेच्या विश्वासाचा, विकासाच्या राजकारणाचा आणि ठाम नेतृत्वाचा भव्य विजय आहे. अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.चैतन्यबापू देशमुख यांनी व्यक्त केली.



या ऐतिहासिक यशाबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन,मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस,भारतीय जनता पार्टीच्या सर्व नेतृत्वाचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार! हा विजय दर्शवतो की, देशातील जनता आता खोट्या आश्वासनांना कँटाळली असून विकास, पारदर्शकता आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणाऱ्या भाजपच्या विचारसरणीवर विश्वास ठेवत आहे. पश्चिम बंगालसारख्या राज्यात मिळालेला विजय हा परिवर्तनाची नांदी असून, आसाममधील यश हे विकासाच्या मार्गावर जनतेने दिलेला ठाम कौल आहे. भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने केलेल्या अथक परिश्रमाचे हे फळ आहे. असे चैतन्य देशमुख यांनी म्हटले आहे.

# पर्समधून दागिणे लंपास

नांदेड/प्रतिनिधी-रिक्षातून प्रवास करणाऱ्या एका महिला प्रवाशाची नजर चुकवून अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ५५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. रुपाली बालाजी कदम (वय ४३, रा.महाजननगर) या २ मे रोजी सकाळी ८.४५ च्या सुमारास आसना पूल ते छत्रपती चौक असा ऑटोने प्रवास करत होत्या. या प्रवासा दरम्यान गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला. याप्रकरणी रुपाली कदम यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस हवालदार जाधव या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश-३ यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४९/२०२६
नागेश ज्ञानेश्वर कदम व ईतर वि.निरंक

अर्जदार : १) नागेश पि.ज्ञानेश्वर कदम, वय १५ वर्ष, व्यवसाय-शिक्षण, २) अर्चना पि.ज्ञानेश्वर कदम, वय १२ वर्ष, व्यवसाय-शिक्षण, अर्जदार क्र.१ व २ अज्ञान पा.क.आई अरुणा भ्र.ज्ञानेश्वर कदम, वय ४० वर्ष, व्यवसाय-घरकाम, ३) अरुणा भ्र.ज्ञानेश्वर कदम, वय ४० वर्ष, व्यवसाय-घरकाम, ४) कोमल पि.ज्ञानेश्वर कदम, वय २० वर्ष, व्यवसाय-घरकाम, ५) चांगुणा पि.ज्ञानेश्वर कदम, वय १८ वर्ष, व्यवसाय-घरकाम, ६) चांदु पि.परसराम कदम, वय ४३ वर्ष, व्यवसाय-शेती, सर्व रा.वडगाव, ता.जि.नांदेड.

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अल्पवयीन अर्जदाराच्या संयुक्त स्थावर मालमत्तेची कायम विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज

उपरोक्त विषयास अनुसरुन वरील अर्जदार क्र.१, २, ४, ५ यांचे वडील व अर्जदार क्र.३ यांचे पती, तसेच अर्जदार क्र.६ यांचे भाऊ नामे ज्ञानेश्वर पि.परसराम कदम यांचा दि.०१.०६.२०२० रोजी मृत्यु झालेला आहे. त्यांच्या हयातीत मयत ज्ञानेश्वर परसराम कदम व अर्जदार क्र.६ यांची सामाईक नावावर असलेली स्थावर मालमत्ता चिकाळा, ता.मुदखेड जि.नांदेड येथे असून त्या मालमत्तेचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

गट क्र.२०२, १.५५ आर.एकुण क्षेत्रफळाच्या चर्तुःसिमा

पुर्वेस :- प्रभाकर संभाजी किरकन यांची जमिन, पश्चिमेस :- इंगोले यांची जमीन, दक्षिणेस :- शिवरस्ता, कॅनल रोड, उत्तरेस :- शिवरस्ता.

सदरची मिळकत मयत ज्ञानेश्वर परसराम कदम व चांदु परसराम कदम यांच्या समान अर्ध्या-अर्ध्या हिस्सा मालकीची आहे. मयत ज्ञानेश्वर परसराम कदम यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्र.१ ते ५ हे मयताचे वारस, अर्जदार क्र.१ व २ हे अज्ञान असल्याने त्यांच्यामार्फत पालनकर्ती त्यांची आई अर्जदार क्र.३ अरुणा भ्र.ज्ञानेश्वर कदम व अर्जदार क्र.६ यांनी वरील वर्णनातील जमिन अर्जदार क्र.१ व २ यांचे शिक्षण व अर्जदार क्र.४ चे लग्नासाठी विकण्याची परवानगी मिळणे बाबत अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

तरी कोणास या विक्री व्यवहारा बद्दल काही आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा दि.०६.०५.२०२६ पर्यंत दाखल करावा. अन्यथा नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही आणि सदरील अर्जाचा योग्य तो विचार करुन अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज दि.०९ एप्रिल,२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व सहीनिशी दिले.

| | |
|---|---|
| | आदेशावरुन |
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| जिल्हा न्यायालय-३, नांदेड | जिल्हा न्यायालय, नांदेड |

## तलवार बाळगणाऱ्या अल्पवयीन मुलास अटक

नांदेड/प्रतिनिधी-नेरली येथे हातात तलवार घेवून दहशत निर्माण करणाऱ्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकास पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. सोमवारी दुपारी नेरली भागात विधीसंघर्षग्रस्त बालक हातात तलवार घेवून दहशत निर्माण करीत होता. या घटनेची माहिती समजताच भाग्यनगर पोलीसांनी त्यास ताब्यात घेतले.

# निष्काळजीपणाचा बळी;महामार्ग कामावर कामगाराचा मृत्यू

## सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील मौजे जुनापाणी (ता.माहूर, जि.नांदेड) येथे राष्ट्रीय महामार्गावरील पुलाच्या बांधकामादरम्यान घडलेल्या गंभीर अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. संबंधित कन्स्ट्रक्शन कँमनीच्या कथित निष्काळजीपणामुळे ऑपरेटर अजित यादव (वय ३५, रा. झारखंड) यांचा मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून दि.१ मे रोजी मृत्यू झाला.

या प्रकरणी दि.२ मे रोजी वाहनचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी घटनेची गंभीरता लक्षात घेता केवळ चालकापुरती कारवाई मर्यादित न ठेवता संपूर्ण प्रकरणाची सखोल व बहुआयामी चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे. सदर घटनेनंतरही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने स्थानिक पातळीवर तीव्र संताप व्यक्त होत आहे. बांधकाम कामगारांच्या सुरक्षेसंदर्भातील नियमांचे सर्रास उल्लंघन झाल्याचा आरोप युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी निवेदनाद्वारे केला आहे.तक्रारीनुसार, संबंधित कन्स्ट्रक्शन कँपनीकडून जिल्ह्यातील विविध मोठ्या कामांचे टेंडर मिळवून मनमानी कारभार केला जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. टेंडर घेतल्यानंतर कामे सब-कॉन्ट्रॅक्टद्वारे टक्केवारीवर सोपविणे, मंजूर अंदाज पत्रकानुसार काम न करणे, तसेच अपूर्ण कामे करून पूर्ण बिलांची उचल करणे, अशा गंभीर अनियमिततांचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, नांदेड जिल्ह्यात यापूर्वीही अशा स्वरूपाच्या घटना घडल्याचा दावा करण्यात येत असून, त्या घटनांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप निवेदनात नमूद करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर, संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीच्या मालकावर भारतीय दंड संहितेअंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, तसेच कंपनीला कायमस्वरूपी काळ्या यादीत समाविष्ट करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नांदेड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी मुख्य अभियंता तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक, नांदेड यांना प्रतिलिपी देण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांच्या न्यायालयात,नांदेड
HMP.No.94/2024
Manisha Waghmare Vs.Sanjay Digambar Waghmare

प्रति,
गैरअर्जदार - संजय पि.डिगांबर वाघमारे उर्फ नवघरे
वय ३८ वर्ष धंदा ड्रायव्हर रा.अलूवडगाव पोस्ट नावंदी,ता.नायगाव जि.नांदेड

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार मनीषा यांनी आपल्या विरुध्द वरील प्रमाणे प्रकरण दाखल केले आहे. प्रस्तूत याचिकेत आपणास प्रतिवादी केलेले आहे. सदर प्रकरणात आपणास आपली बाजू मांडण्याकरिता या न्यायालयातर्फे बऱ्याच वेळा अर्जात नमूद पत्यावर समन्स पाठविण्यात आले होते. परंतु असे दिसून येत आहे की, नमुद पत्यावर आपण मिळुन येत नाहीत किंवा आपला ठावठिकाणा आढळत नाही किंवा आपण जाणून बुजून सदर प्रकरणातील समन्स स्वीकारण्यात टाळाटाळ करित आहात.

त्याअर्थी उपरोक्त नमूद प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून आपणास याद्वारे सुचित करण्यात येत आहे की, आपण स्वतः अगर वकीलामार्फत दिनांक १६/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तसेच उपरोक्त प्रकरणात वर्तमानपत्रा मधील जाहीर प्रगटनाच्या मुदतीपुर्वी हजर होउन आपली बाजू मांडावी, अन्यथा आपणास या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे समजून उपरोक्त प्रकरण आपल्या विरुध्द एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक २०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| | आदेशावरुन |
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **क.लिपीक** | **सहा.अधिक्षक** |
| २ रे सह दि.न्या.व.स्तर,नांदेड | २ रे सह दि.न्या.व.स्तर,नांदेड |

# चालत्या कारला आग,जीवितहानी नाही

नांदेड/प्रतिनिधी-उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे ३ मे रोजी दुपारी माळेगाव टोल नाक्याजवळ धावती कार जळून खाक झाली. विशाल शेटकार हे ३ मे रोजी एमएच १४ डीएफ ८९१४ या क्रमांकाच्या कारने नातेवाईकांसोबत लग्न समारंभासाठी लोह्याला आले गेले होते. लग्न सोहळा आटोपून दुपारी अहमदपूरकडे जात असताना माळेगाव टोल नाक्याजवळ दुपारी २.४५ च्या सुमारास गाडीच्या बंपर मधून धूर निघत असल्याने गाडी रस्त्याच्या कडेला त्यांनी उभी केली. परंतु उष्णतेमुळे अवघ्या काहीवेळात पेट घेतला. आग विझवण्यासाठी शेटकार यांनी इकडे, तिकडे पाण्याचा शोध घेतला, मात्र पाणी न मिळाल्यामुळे त्यांच्या समोरच कार जळून खाक झाली. यामध्ये आर्थिक हानी झाली असली तरी सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. कारमधील प्रवाशांनी प्रसंगावधान राखत वेळीच गाडीबाहेर उडी घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

## खंजर बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर शहरातील कुंभारगल्ली भागात खंजर घेवून फिरणाऱ्या एका इसमास पोलीसांनी सोमवारी दुपारी अटक केली आहे. माधव गोविंद कोंडामंगले रा. रोहीदास चौक देगलूर हा एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने सोमवारी दुपारी कुंभारगल्ली भागात खंजर घेवून फिरत होता. या घटनेची माहिती पोलीसांना समजताच त्यांनी कुंभारगल्ली भागात जावून माधव कोंडामंगले यास अटक केली.

# बारावी निकालात आयशा अकबानी व सोनाक्षी धकाते प्रथम

माहूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात माहूर तालुक्यातील कला शाखेतून कै. पार्वतीबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी आयशा युसुफ अकबानी हिने ८३.६७ टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, कोणत्याही शिकवणी वर्गाचा आधार न घेता केवळ जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण





अभ्यासाच्या जोरावर तिने हे यश मिळवले आहे. तर विज्ञान शाखेतून जीनीयस किड्स इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजची विद्यार्थिनी कु सोनाक्षी धकाते हिने ८३.५० टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. या दोन्ही विद्यार्थिनींच्या उल्लेखनीय यशामुळे माहूर तालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीला नवे बळ मिळाले असून, इतर विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणादायी ठरत आहेत.

# मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी १२ दोषींना कारावास

नवी दिल्ली: मुंबईतील १९९३ च्या भीषण साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात पाकिस्तानी लष्कराचा सहभाग होता. असे स्पष्ट करीत या प्रकरणातील बारा दोषींना दिल्लीतील विशेष टाडा न्यायालयाने तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणाचा निकाल तब्बल ३० वर्षानंतर लागला आहे. या ऐतिहासिक निकालात न्यायालयाने स्पष्ट केले की भारताला अस्थिर करण्याच्या या कटामध्ये पाकिस्तानच्या लष्करी यंत्रणेचा थेट सहभाग होता. असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राची राजधानी मुंबईत १९९३ साली एकामागून एक भीषण साखळी स्फोट झाले होते. याप्रकरणी दिल्लीतील विशेष टाडा न्यायालयाचे न्या.रॉबिन पी. मोगेरा यांनी पाकिस्तानच्या नौदलाशी संबंधित घटक आणि लष्करी अधिकाऱ्यांनी शस्त्रास्त्रांची तस्करी सुलभ केली होती. या कटाचा सूत्रधार फरार अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम आणि त्याचा साथीदार टायगर मेमन असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.या प्रकरणात सलीम कुत्ता आणि मामुमिया पंजुमिया यांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर उर्वरित १० दोषींना पाच वर्षांचा कारावास ठोठावण्यात आला. शिक्षा जाहीर होताच सर्व दोषींना ताब्यात घेऊन कारागृहात पाठवण्यात आले. याच खटल्यात दाऊद इब्राहिम, अनीस इब्राहिम, छोटा शकील आणि टायगर मेमन यांच्यासह १५ जणांना न्यायालयाने फरार घोषित केले आहे. सरकारी पक्षाने न्यायालयात सिद्ध केले की हा संपूर्ण कट दुबई येथे रचण्यात आला होता. बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर देशात जातीय तणाव निर्माण करण्याच्या उद्देशाने समुद्रमार्गे आरडीएक्स, रायफल्स आणि ग्रेनेड्सची मोठ्या प्रमाणावर तस्करी करण्यात आली. पाकिस्तानच्या मरीन सिक्युरिटी एजन्सीने या शस्त्रवाहतुकीस सक्रिय मदत केल्याचेही तपासात उघड झाले.तपासादरम्यान कराचीहून निघालेल्या स्फोटकांचा साठा गुजरातच्या किनारपट्टीवर उतरवण्यात आला होता. त्यानंतर या शस्त्रांचा पुरवठा महाराष्ट्रासह देशातील विविध भागांत करण्यात आला. जामनगर आणि कच्छ येथील स्थानिक घटकांचा या साखळीत शेवटचा दुवा म्हणून वापर करण्यात आल्याचेही स्पष्ट झाले. या संवेदनशील प्रकरणाच्या तपासात निवृत्त आयपीएस अधिकारी पी.के.झा, सतीश वर्मा तसेच सीबीआयचे विशेष संचालक मनोज शशीधर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# प्रशासक राजवटीत रोजगार हमी योजनेचे काम ठप्प



देगलूर/प्रतिनिधी- महाराष्ट्रातील बावीस जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन व तांत्रिक अडचणीमुळे दीर्घ काळापासून रखडल्या आहेत. लोकशाहीचा कणा मानल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था आज अस्तित्वाच्या संकटात सापडले आहेत. निवडणुका न झाल्याने सर्वत्र प्रशासक राजवट लागू असून पंचायत राज व्यवस्थेचे अक्षरशा: खच्चीकरण होत असल्याची तीव्र भावना ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.

देगलूर तालुक्यात याचे गंभीर परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत. मागील एक वर्षापासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना जवळपास ठप्प झाल्याचे चित्र आहे. मजुरांच्या हाताला काम नसल्याने रोजगारांच्या शोधात अनेक गावातील नागरिक स्थलांतर करत असून, काही गावात अर्धे गाव खाली झाल्याचे वास्तव समोर येत आहे. पंचायत समितीवर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासक म्हणून गटविकास अधिकाऱ्याकडे कारभार आहे. निवडून आलेले लोकप्रतिनिधी नसल्यामुळे सामान्य नागरिकांची व्यासपीठात उरले नाही. शेती, पाणी, रस्ते रोजगार अशा मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असून विकास कामे पूर्णपणे ठप्प पडली आहेत. प्रशासकीय राजवटीत केवळ कागदोपत्री कामकाज सुरू असल्यास आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. जनहिताच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याने शासनाच्या उद्दिष्टांनाही तडा जात आहे. पंचायत समिती कार्यालयातील शिस्त ढासळली असून अधिकारी व कर्मचारी मनमानी करत असल्याची तक्रार आहे. अलीकडे काही दांडी ७२ व लेटलतीफ कर्मचाऱ्यांना नोटीसा देण्यात आल्या मात्र त्यावर ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. देगलूर पंचायत समितीचे कार्यालय हे वरच्या मजल्यावर असून तहसील कार्यालयाच्या खालच्या मजल्यावर असूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याची खंत व्यक्त होत आहे.

# एसटी-स्कॉर्पिओ अपघातात चार जागीच ठार;तिघांची प्रकृती गंभीर

मुंबई/प्रतिनिधी-एसटी महामंडळाची बस व स्कॉर्पिओ वाहनाचा अपघात होवून चार जण जागीच ठार झाले आहेत. तर तिघांची प्रकृती गंभीर आहे. हा अपघात कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील माळशेज घाटात आज दुपारी घडला.

कल्याणहून अहिल्यानगरकडे जाणारी एसटी बस आणि समोरून येणारी स्कॉर्पिओ यांच्यात जोरदार धडक झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की धडकेनंतर एसटी बस रस्त्याच्या बाजूला फेकली गेली. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली असून मदतकार्य तातडीने सुरू करण्यात आले आहे. मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.काही दिवसांपूर्वीच कल्याण-मुरबाड मार्गावरील पांजरा पुलावर झालेल्या अपघातात ११ जणांचा जागीच मृत्यू झाला होता. प्रवासी वाहतूक करणाऱ्या इको गाडीला सिमेंट मिक्सरने धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला होता. त्या घटनेत चालकासह सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला होता.कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमागे अनेक कारणे समोर येत आहेत. रस्त्यावरील तीव्र वळणे आणि काही भागातील अरुंद मार्ग, भाजीपाला वाहतूक, ट्रक आणि बसची मोठी वर्दळ, ओव्हरस्पीडिंग आणि नियमांचे उल्लंघन, ओव्हरलोडिंग आणि बेकायदेशीर वाहतूक, अपुऱ्या पथदिव्यांमुळे रात्रीचा वाढणारा धोका, घाटात कोसळणाऱ्या दरडी तसेच पावसाळ्यात निसरडा होणारा रस्ता ही प्रमुख कारणे मानली जात आहेत. चौपदरीकरणाच्या कामामुळे अनेक ठिकाणी करण्यात आलेले डायव्हर्जनही अपघातांना कारणीभूत ठरत आहेत.

# भाजपच्यावतीने नरसीत मतदार पुनर्निरीक्षण अभियान कार्यशाळा

नायगाव/प्रतिनिधी- भारतीय जनता पार्टीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विधानसभा निहाय मतदार पुनर्निरीक्षण अभियान अंतर्गत कार्यशाळा शनिवारी नरसी येथील पद्मावती मंगल कार्यालय, भगवान बालाजी मंदिर नरसी येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस भाजपचे प्रदेश महामंत्री तथा माजी आ.सुनील राणे यांच्या प्रमुख उपस्थिती लाभली.

या अभियानाचे आयोजन आ.राजेश संभाजी पवार यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. या कार्यशाळेत सहभागी कार्यकर्त्यांना मतदार यादी पुनर्निरीक्षणाच्या विविध बाबींबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी सुनीलजी राणे यांनी बूथ स्तरावरील काटेकोर नियोजन, घराघरात जाऊन मतदारांची पडताळणी तसेच कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येक कार्यकर्ता अधिक सक्षम, सजग आणि कृतीशील होऊन या अभियानात सक्रिय सहभाग घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



या प्रसंगी जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, राजेश कुंटूरकर, सौ.पुनम पवार, लक्ष्मणराव ठक्करवाड, डॉ. माधवराव उच्चेकर, माणिकराव लोहगावे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदीप रामपुरे, सुर्याजी चाडकर, बापुसाहेब कौडगावकर, शिवराज जाधव, श्रीहरी देशमुख, बालाजी मदेवाड, ज्ञानेश्वर पाटील सावंत, ॲड. चक्रेश पाटील बन्नाळीकर, बालाजी ढगे, विजय डांगे, मनोहर पवार, प्रतिभा धानोरकर, राहुल शिंदे यांच्यासह धर्माबाद नगरपालिकेतील भाजपचे सर्व नगरसेवक तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनंज येथे मातीसोबत रेतीही धोक्यात;अवैध उत्खनन करणाऱ्यांची पुढची नजर

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील धनंज परिसरात मोठ्या प्रमाणात माती उत्खनन सुरू असतानाच आता रेतीही उघडी पडल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. ज्या ठिकाणी माती उत्खनन सुरू आहे, त्याच ठिकाणाच्या उजव्या बाजूस मोठ्या प्रमाणात रेती उघडी पडलेली असल्याचे दिसून येत आहे. या उघड्या पडलेल्या रेतीवर अवैध उत्खनन करणाऱ्या दलालांची नजर लागल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून समोर येत आहे.

सध्या सुरू असलेला माती उत्खननाचा प्रकार ज्या वेगाने सुरू आहे, त्याच धर्तीवर पुढील दोन ते तीन दिवसांत रेतीचीही मोठ्या प्रमाणात लूट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उघडी पडलेली रेती टिप्परच्या माध्यमातून भरून नेली जाऊ शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.सध्या महसूल, पोलीस व संबंधित यंत्रणांचा कोणताही धाक या अवैध उत्खनन करणाऱ्यांवर उरलेला नसल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी, माती, मुरूम व वाळू चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, या प्रकरणात काही महसूल कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, तलाठी कदम हे सांगवी येथून मुरूम तसेच धनंज येथील माती उत्खननास अप्रत्यक्ष पाठिंबा देत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. त्यामुळेच अवैध उत्खननाला आळा बसत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय, या प्रकारातून संबंधितांना आर्थिक लाभ मिळत असल्याची चर्चा रंगत असून, याच कारणामुळे हा अवैध व्यवसाय सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, या सर्व आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून संबंधित यंत्रणांनी याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.या बेकायदेशीर उत्खननामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत असून नदीकाठाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वेळेत नियंत्रण न ठेवल्यास मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संपत्तीची लूट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, उमरी तालुक्यातील काही मुरूम, रेती व माती माफिया या भागात सक्रिय असल्याचे समोर येत आहे. नाममात्र रॉयल्टीधारक म्हणून एका कुंभाराचे नाव वापरले जात असून, तो केवळ १५ हजार रुपये घेऊन बाजूला राहत असल्याची चर्चा आहे. प्रत्यक्षात घाटा-फायदा हा पूर्णपणे माफियाचाच होत असल्याचे सांगितले जाते. एकाच व्यक्तीच्या नावावर विविध ठिकाणी रॉयल्टी घेऊन हा अवैध प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोपही केला जात आहे.

# सरस विद्यालयाचा बारावी परीक्षेत ८५ टक्के निकाल

मांडवी/प्रतिनिधी- इंदिराबाई राठोड ट्रस्टद्वारा संचलित सरस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदाही आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत इयत्ता बारावीचा ८५.१८ टक्के निकाल नोंदविला आहे. घोषित झालेल्या या निकालात विद्यार्थ्यांनी समाधानकारक कामगिरी करत संस्थेचा लौकिक उंचावला.

चालू शैक्षणिक वर्षात एकूण २७ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी प्रथम श्रेणीत ३, द्वितीय श्रेणीत ८, तर तृतीय श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ४ विद्यार्थी अनुत्तीर्ण ठरले.दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी यशाची परंपरा कायम ठेवत अव्वल स्थान पटकावले. कु. प्रतिक्षा गजानन गाठे हिने ७३.८३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. गौरव भारत वाघाडे याने ६४.०६ टक्के गुणांसह द्वितीय स्थान पटकावले, तर कु. छकुली काशिनाथ गाठे हिने ६२.०८ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. विशेष म्हणजे, अव्वल तीनपैकी दोन विद्यार्थिनी पाटोदा (बु.) येथील असून एक विद्यार्थी शिरपूर येथील आहे. विद्यालयाच्या या यशस्वी निकालाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गंगन्ना नेम्मानीवार, सचिव नितीन राठोड, कोषाध्यक्ष माधवराव श्रीमनवार तसेच ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे अभिनंदन केले. यासोबतच प्राचार्य तथा मुख्याध्यापक रमेश पडगिलवार आणि उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक विजय जयस्वाल, घनश्याम राठोड, डॉ. वसंत राठोड यांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक करण्यात आले. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण निकालामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून पुढील वाटचालीसाठी सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# शिवणी येथे ५६ हजाराचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-शिवणी ता.किनवट येथे अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्या इसमास पोलीसांनी रविवारी दुपारी अटक करुन त्याच्या जवळील ५६ हजार रुपयांचा गुटखा व एक दुचाकी जप्त केली आहे. संतोष दिलीप कोटलवार (वय ४६) रा.शिवणी हा अवैधरित्या गुटखा विक्री करीत असल्याची माहिती इस्लापूर पोलीसांना मिळाली. शिवणी येथे रविवारी दुपारी पोलीसांनी सापळा रचून दुचाकीवर गुटखा घेवून जात असतांना संतोष कोटलवार यास पोलीसांनी पकडले. त्याच्या जवळून शासनाने प्रतिबंधीत केलेला विविध कंपनीचा ५६ हजार रुपयांचा गुटखा व दुचाकी असा ८६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीस जमादार राजेश राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इस्लापूर पोलीस ठाण्यात संतोष कोटलवार याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड
## ई-निविदा सूचना क्र.(०२) सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड (दुरध्वनी ०२४६२/२५३७११) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील **मजूर सहकारी संस्था कडुन ब-१** नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे जि.नांदेड मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये ०५ कामे समाविष्ट असून या निविदेअंतर्गत संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. या निविदेसंबंधी संपुर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

www.mahapwd.gov.in
https://mahatenders.gov.in

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड

डीजीआयपीआर/आरओसी-२०२६-२७/क्र.-५/सी ५८२


# मौजे कावळगाव येथे जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मौजे कावळगाव येथे सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी सायंकाळी पोलीसाच्या एका पथकाने धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या पंधरा जणांना अटक करण्यात आली.

मौजे कावळगाव येथे जुगार अड्डा सर्रासपणे सुरु होता. रविवारी सायंकाळी देगलूर पोलीसांनी सदरील जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना रावसाहेब यादव चिंचोले (वय ४०) यांच्यासह १४ जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख ८ हजार रुपये, मोबाईल फोन, दुचाकी वाहन असा २ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. पोलीस शिपाई बळीराम घुले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन देगलूर पोलीस ठाण्यात पंधरा जणांविरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोहण्यासाठी गेलेल्या युवकाचा विहिरीत बुडून मृत्यू

मुखेड/प्रतिनिधी- तालुक्यातील केरूर येथे पोहण्यासाठी गेलेल्या एका युवकाचा विहिरीत उडी मारल्यानंतर दुर्दैवी मृत्यू झाला. सदर घटना सोमवार दि.४ मे रोजी घडली. या घटनेमुळे केरूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केरूर येथील रहिवासी व सध्या मुखेड येथे वास्तव्यास असलेला व्यंकट बालाजी कोंडामंगले हा युवक नुकताच बारावी परीक्षेत उत्तीर्ण झाला.होता. बारावी उत्तीर्ण झाल्याच्या आनंदात त्याने गावात जाऊन मित्रमंडळींना पेढे वाटप केले होते. त्यानंतर व्यंकट व त्याचे अन्य तीन मित्र गावाशेजारी देगलूर रोडवरील सोनकांबळे यांच्या शेतातील विहिरीवर पोहण्यासाठी गेले होते. यावेळी दोन युवकांनी विहिरीत उड्या मारल्या, तर अन्य दोघे विहिरीच्या काठावर उभे होते. व्यंकटने विहिरीत उडी मारल्यानंतर तो अचानक बेशुद्ध होऊन पाण्यातच पडल्याचे मित्रांच्या लक्षात आले. त्यानंतर त्याच्या मित्रांनी तत्काळ प्रयत्न करून त्याला बाहेर काढले. मात्र बाहेर काढल्यानंतर तो मृत अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले.

# पश्चिम बंगाल-आसाम विजयाचा कुंडलवाडीत जल्लोष

कुंडलवाडी/प्रतिनिधी- भारतीय जनता पार्टीला पश्चिम बंगाल व आसाम राज्यांत मिळालेल्या उल्लेखनीय यशाच्या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी शहरात भाजप कार्यकर्त्यांनी उत्साहात विजयाचा जल्लोष साजरा केला. शहरात ठिकठिकाणी आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

या जल्लोषाचे नेतृत्व कुंडलवाडीच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी केले. यावेळी उपनगराध्यक्षा नेहा ताई शैलेश ऱ्याकावार, प्रतिष्ठित व्यापारी व पानसरे शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष तसेच नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, भाजप जिल्हा डॉक्टर सेल अध्यक्ष डॉ. हनमंतराव लखमपुरे, गटनेते रमेश ईरलावार यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, गुलाल उधळून व जोरदार घोषणाबाजी करत विजयाचा आनंद साजरा केला. भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. राज्यभर भाजपाला मिळालेल्या यशामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात संघटन अधिक बळकट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

पान १ वरुन

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत...

निर्णय घेण्यात आला. लैंगिक गुन्ह्यांतील आरोपींपैकी ८० ते ९० टक्के आरोपी हे पूर्वी अशाच गुन्ह्यांत अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात आणि सुटकेनंतर पुन्हा गुन्हे करतात, असे निरीक्षण बैठकीत मांडण्यात आले. त्यामुळे अशा आरोपींना पॅरोल नाकारण्याबाबत पुन्हा कडक कायदा करण्याचे निर्देश विधी व न्याय विभागाला देण्यात आले आहेत.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, २०१४ ते २०१९ या त्यांच्या पूर्वीच्या कार्यकाळात अशा प्रकारचा कायदा लागू करण्यात आला होता. मात्र नंतर न्यायालयाने तो रद्द केला. आता पुन्हा अधिक सक्षम आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम असा कायदा तयार करण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४